MHWS090011452023

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २७/१०/२०२३ |
| नोंदणी दिनांक | : | २७/१०/२०२३ |
| निकाल दिनांक | : | २९/०७/२०२६ |
| कालावधी | | वर्ष महिना दिवस<br>०२ ०९ ०२ |

## न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग (न्यायालय क्र.१) मानोरा यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी : ज. तु. कोरेगांवकर)

सीएनआर नं.एमएचडब्ल्युएस : ०९००११४५२०२३

म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र. : २५/२०२३

निशाणी क्रमांक : २८

१. सौ. बाली उर्फ सुनिता रंजीत चव्हाण )
वय अं.: ३३ वर्ष, धंदा : घरकाम )
रा. ह.मु. जमुनाबाई नामदेव राठोड यांचे घरी, )
आसोला खु. ता. मानोरा, जि.वाशिम. )

२. सोहम रंजीत चव्हाण )
वय अं.: १२ वर्ष, धंदा: शिक्षण )

३. सम्राट रंजीत चव्हाण )
वय अं.: ११ वर्ष, धंदा: शिक्षण )
(अर्जदार क्र.२ व ३ तर्फे अ.पा.क. आई अर्जदार क्र.१) ) .... अर्जदार

विरुध्द

१. रंजीत गोकुळ चव्हाण )
वय अं.: ३८ वर्षे, धंदा : शेती व दुग्ध व्यवसाय )

२. गोकुळ शामराव चव्हाण )
वय अं.: ६५ वर्षे, धंदा : शेती )

३. सौ. तला गोकुळ चव्हाण )
वय अं.: ६० वर्षे, धंदा : शेती )

४. जगदीश गोकुळ चव्हाण )
वय अं. : ४० वर्षे, धंदा : नौकरी, )
अ.क्र.१ ते ४ रा. भुली, ता.मानोरा, जि.वाशिम. )

५. ममता संजय राठोड )
वय अं.: ३५ वर्षे, धंदा : घरकाम )

६. संजय राठोड )
वय अं.: ४० वर्षे, धंदा : शेती )
अ.क्र.५ व ६ रा. नायगाव, ता. दारव्हा, )
जि.यवतमाळ ) ....गैरअर्जदार

अर्जदारतर्फे विधीज्ञ : श्री. जी. आर. राठोड

गैरअर्जदारांतर्फे विधीज्ञ : श्री. एस. एन. पखाले

कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२, १८, १९, २० व २२ प्रमाणे.

## न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक २९ जुलै, २०२६ रोजी )

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ ते २४ प्रमाणे दाखल केला आहे.

अर्जदाराचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

२. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी असून गैरअर्जदार क्र.२ ते ६ हे गैरअर्जदार क्र.१ चे नातेवाईक आहेत. त्यांचे लग्न दि.२३.०४.२०१२ रोजी मौजा–आसोला खु. येथे संपन्न झाले. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारांकडे मौजा–भुली ता. मानोरा,

जि.वाशिम येथे नांदावयास गेल्यानंतर सुरुवातीचे दोन–तिन महिने गैरअर्जदारांनी तिला चांगली वागणुक दिली. परंतु त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ ते ४ हे तिला माहेरवरुन ५० हजार रुपये आणण्याकरीता मानसिक व शारिरीक छळ करीत होते. तर गैरअर्जदार क्र.५ व ६ हे अर्जदार क्र.१ हिस त्रास देण्याकरीता प्रोत्साहीत करीत होते. गैरअर्जदार क्र.१ हा तिला दारुच्या नशेत नेहमीच अश्लील शिवीगाळ करुन अपमानित करीत होता व मारहाण सुद्धा करीत होता. गैरअर्जदार क्र.१ ते ४ हे नेहमीच अर्जदार क्र.१ हिचेबद्दल गैरअर्जदार क्र.१ ला खोटेनाटे सांगुन तु हिला सोडून दे, तुला चांगली श्रीमंत घरची हुंडा देणारी बायको करुन देतो असे म्हणुन तिला पैशाकरीता माहेरी पाठवत होते. अर्जदार क्र.१ हिस गैरअर्जदार क्र.१ पासून सोहम व सम्राट अशी दोन मुले जन्मास आली. दोन्ही मुलाच्या डिलेवारीचे वेळेस गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ हिला माहेरी हाकलून लावले होते. त्यामुळे डिलेवारीचा संपुर्ण खर्च तिच्या वडीलांनीच केला. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ हिला काम करण्याकरीता पुणे येथे घेवून गेला. तेथे सुद्धा गैरअर्जदार क्र.१ हा नेहमी दारु पिवून तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता व तिला मारहाण करीत होता. बरेचदा अर्जदार हिच्या माहेरील लोकांनी गैरअर्जदार क्र.१ ची समजुत काढली परंतु त्याच्या स्वभावात काहीच फरक पडला नाही.

३. अर्जदार क्र.१ हिचे पुढील कथन असे की, दि.१०.०४.२०२३ रोजी गैरअर्जदार क्र.१ सोबत अर्जदार ही पुणे येथे नांदत असतांना गैरअर्जदार क्र.१ ने इतर गैरअर्जदार यांच्या चिथावणीवरुन अर्जदार क्र.१ हिला ५० हजार रुपये आणण्याच्या कारणावरुन तिचा शारिरीक व मानसिक छळ करुन बेदम मारहाण केली व दोन्ही मुलांना घेवून भुली येथे निघून आला व अर्जदार हिला एकटीला पुणे येथे सोडून दिले. त्यामुळे अर्जदार क्र.१ ही कशीबशी पुणे येथुन तिचे माहेरी आली. त्यानंतर अर्जदार व तिचे माहेरील लोकांनी गैरअर्जदार क्र.१ ला नांदवण्याकरीता विनवणी केली व अनेकवेळा समजुत काढण्याचा प्रयत्न सुद्धा केला परंतु गैरअर्जदार क्र.१ ने नांदवण्यास साफ नकार दिला. त्यामुळे नाईलाजास्तव ती माहेरी राहत आहे. अर्जदार हिस तिच्या जवळच्या नातेवाईकांकडून गैरअर्जदार क्र.१ ने

अवैधरित्या दुसरे लग्न केल्याचे समजले. तेंव्हापासुन गैरअर्जदार यांनी कधीही अर्जदार क्र.१ हिची साधी विचारपुस देखील केली नाही किंवा तिला नांदण्यास देखील घेवून गेले नाही. तसेच दोन्ही मुलांना भेट्रू सुद्धा दिले नाही. अर्जदार क्र.१ हिला तिचे खाणे–पिणे, औषधपाणी, कपडेलत्ते याकरीता देखील कोणतीही मदत केली नाही.

४. अर्जदार क्र.१ जवळ कोणतेही उत्पन्नाचे साधन नसुन ती कोणतेही कामधंदा करण्यास असमर्थ आहे. याउलट गैरअर्जदार क्र.१ ते ४ यांचेकडे एकत्र कुटुंबाची मौजा–भुली येथे अंदाजे ८ ते १० एकर ओलिताची शेतजमीन असुन सदर शेतजमीनीतुन गैरअर्जदार क्र.१ ते ४ हे वर्षाला ७ ते ८ लाख रुपये उत्पन्न घेतात. याशिवाय गैरअर्जदार क्र.१ कडे दुधदुभत्या गाई–म्हशी असुन त्यापासून त्यांना महिन्याला १५ ते २० हजार रुपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारांच्या उदरनिर्वाहासाठी कोणतीही सोय केलेली नाही. करीता अर्जदाराने सदरील अर्ज दाखल केला आहे.

५. गैरअर्जदार यांना पुरेशी संधी दिल्यानंतर सुद्धा गैरअर्जदारांनी मुख्य प्रकरणाला त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला नाही.

६. खालील वाद प्रश्न माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष खाली नमुद विवेचनासह नोंदविण्यात येत आहे.

| क्र. | वाद प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचार केला, ही बाब अर्जदार हिने शाबीत केली आहे काय ? | होय. |
| २. | कौटुंबिक हिंसाचार कायद्याप्रमाणे अर्जदार हि आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. अर्जदार क्र.१ यांना दर महा रक्कम रु.२,०००/– व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये १,०००/– प्रमाणे |

| क्र. | वाद प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ३. | कोणता आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

वाद प्रश्न क्र.१ करीता –

७. अर्जदार क्र.१ हिने आपल्या अर्जाच्या समर्थनार्थ स्वतःचा पुरावा शपथपत्र (नि.२४) दाखल केले. अर्जदार हिच्या साक्षीनुसार गैरअर्जदार क्र.१ हे त्यांचे पती असून गैरअर्जदार क्र.२ ते ६ हे गैरअर्जदार क्र.१ चे नातेवाईक आहेत. त्यांचे लग्न गैरअर्जदार क्र.१ सोबत दि.२३.०४.२०१२ रोजी मौजा–आसोला खु. येथे संपन्न झाले. लग्नानंतर त्या गैरअर्जदारांकडे मौजा–भुली ता. मानोरा, जि.वाशिम येथे नांदावयास गेल्यानंतर सुरुवातीचे दोन–तिन महिने गैरअर्जदारांनी त्यांना चांगली वागणुक दिली. परंतु त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ ते ४ हे त्यांना माहेरवरुन ५० हजार रुपये आणण्याकरीता मानसिक व शारिरीक छळ करीत होते. तर गैरअर्जदार क्र.५ व ६ हे त्यांना त्रास देण्याकरीता प्रोत्साहीत करीत होत्या. गैरअर्जदार क्र.१ हा त्यांना दारुच्या नशेत नेहमीच अश्लील शिवीगाळ करुन अपमानित करीत होता व मारहाण सुद्धा करीत होता. गैरअर्जदार क्र.२ ते ४ हे नेहमीच त्यांच्याबद्दल गैरअर्जदार क्र.१ ला खोटेनाटे सांगुन तु हिला सोडून दे, तुला चांगली श्रीमंत घरची हुंडा देणारी बायको करुन देतो असे म्हणुन त्यांना पैशाकरीता माहेरी पाठवत होते. त्यांना गैरअर्जदार क्र.१ पासून सोहम व सम्राट अशी दोन मुले जन्मास आली. दोन्ही मुलाच्या डिलेवरीचे वेळेस गैरअर्जदार क्र.१ ने त्यांना माहेरी हाकलून लावले होते. त्यामुळे डिलेवारीचा संपुर्ण खर्च त्यांच्या वडीलांनीच केला. अशातच तिन वर्षापुर्वी गैरअर्जदार क्र.१ ने त्यांना काम करण्याकरीता पुणे येथे घेवून गेल्यानंतर तेथे सुद्धा गैरअर्जदार क्र.१ हा नेहमी दारु पिवून त्यांच्या चारित्र्यावर संशय घेत होता व तिला मारहाण करीत होता. बरेचदा त्यांच्या माहेरकडील नातेवाईकांनी गैरअर्जदार क्र.१ ची समजुत काढण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांच्या स्वभावात काहीच फरक पडला नाही. त्यानंतर

गैरअर्जदार क्र.१ सोबत त्या पुणे येथे नांदत असतांना इतर गैरअर्जदार यांच्या चिथावणीवरुन त्यांना ५० हजार रुपये आणण्याच्या कारणावरुन त्यांचा शारिरीक व मानसिक छळ करुन बेदम मारहाण केली व दोन्ही मुलांना घेवून भुली येथे निघून आला व त्यांना एकटीला पुणे येथे सोडून दिले. त्यामुळे त्या कशाबशा पुणे येथुन त्यांच्या माहेरी आल्या. त्यानंतर त्यांच्या माहेरील लोकांनी गैरअर्जदार क्र.१ ला नांदवण्याकरीता विनवणी केली व समजुत सुद्धा काढली परंतु गैरअर्जदार क्र.१ ने नांदवण्यास साफ नकार दिला. त्यामुळे नाईलाजास्तव त्या माहेरी राहत आहे. त्यांना त्यांच्या जवळच्या नातेवाईकांकडून गैरअर्जदार क्र.१ ने अवैधरित्या दुसरे लग्न केल्याचे समजले. तेंव्हापासुन गैरअर्जदार यांनी कधीही त्यांची साधी विचारपुस देखील केली नाही किंवा त्यांना नांदण्यास देखील घेवून गेले नाही तसेच दोन्ही मुलांना भेटू सुद्धा दिले नाही. त्यांच्या खाणे–पिणे, औषधपाणी, कपडेलत्ते याकरीता देखील कोणतीही मदत केली नाही. त्यांच्या जवळ कोणतेही उत्पन्नाचे साधन नसुन त्या कोणतेही कामधंदा करण्यास असमर्थ आहे.

८. गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा उलटतपास घेतलेला नाही. करीता ‘अर्जदाराचा उलटतपास नाही’ असा आदेश पारित करण्यात आला.

९. कौटुंबिक हिंसाचार अधिनियम चे कलम २००३ नुसार कौटुंबिक हिंसाचाराची जी व्याख्या दिली आहे त्या व्याख्येनुसार शारिरीक, मानसिक, आर्थिक व भावनिक प्रकारचा हिंसाचार हा कौटुंबिक हिंसाचाराच्या व्याख्येत मोडतो. गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ हिचा शारिरीक, मानसिक, भावनिक तसेच आर्थिक छळ केल्याचे त्यांच्या पुराव्यातून स्पष्ट होते. गैरअर्जदार यांनी अर्जदार यांच्या अर्जाला जबाब दाखल केला नाही तसेच अर्जदार यांचा उलटतपासही घेण्यात आलेला नाही. अर्जदार क्र.१ ह्या गैरअर्जदार यांच्यापासून विभक्त राहत असल्याचे स्पष्ट होते. अर्जदार क्र.१ यांना गैरअर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सिद्ध होते. करीता वाद प्रश्न क्र.१ चे उत्तर ‘होकारार्थी’ नोंदविले आहे.

<u>वाद प्रश्न क्र.२ करीता</u> –

१०. अर्जदार क्र.१ यांनी प्रस्तुत अर्जानुसार त्यांच्या उदरनिर्वाहासाठी रु.२५,०००/–प्रती महिना पोटगी मागितली आहे. अर्जदार क्र.१ यांच्या पुराव्यानुसार तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार क्र.२ व ३ सुद्धा तिच्याकडेच राहत आहे. तसेच अर्जदार ही पुर्णपणे तिच्या आई–वडीलांवर अवलंबून आहे. उलटपक्षी गैरअर्जदार क्र.१ ते ४ यांचेकडे एकत्र कुटुंबाची मौजा–भुली येथे अंदाजे ८ ते १० एकर ओलिताची शेतजमीन असुन सदर शेतजमीनीतुन गैरअर्जदार क्र.१ ते ४ हे वर्षाला ७ ते ८ लाख रुपये उत्पन्न घेतात. याशिवाय गैरअर्जदार क्र.१ कडे दुधदुभत्या गाई–म्हशी असुन त्यापासून ते महिन्याला १५ ते २० हजार रुपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदार क्र.१ यांचे उत्पन्न किती आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ यांची आहे. तसेच अर्जदारांच्या पालन पोषणाची नैतिक व कायदेशिर जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ यांच्यावरच आहे. त्यामुळे अर्जदार हे गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडून उदरनिर्वाहाची रक्कम मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ यांना दरमहा रक्कम रुपये २,०००/– व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये १,०००/– प्रमाणे देण्याचा हुकूम प्राप्त परिस्थितीत न्यायोचित ठरेल. करीता वाद प्रश्न क्र.२ चे उत्तर 'होकारार्थी' नोंदविले आहे.

<u>वाद प्रश्न क्र.३ करीता</u> –

११. वाद प्रश्न क्र. १ व २ वरील निष्कर्षाअंती खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :

<u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ यांना दरमहा रक्कम रुपये २,०००/– (रक्कम रुपये दोन हजार मात्र) व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये १,०००/– (रक्कम रुपये एक हजार मात्र) प्रमाणे निर्वाह भत्ता म्हणून या आदेशाच्या

तारखेपासून देण्याचे आहे.

३. गैरअर्जदार यांनी अर्जदार यांना कोणत्याही स्वरुपात शारिरीक अथवा मानसिक त्रास देवू नये.

४. सदर न्यायनिर्णयाची प्रत्येकी एक साक्षांकित प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना मोफत द्यावी.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला).

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by JAGDISH TULSIDAS KOREGAONKAR
Date: 2026.07.29 16:14:17 +0530

मानोरा (ज. तु. कोरेगांवकर )

दिनांक : २९.०७.२०२६ न्यायदंडाधिकारी (प्र.श्रे.),

(न्यायालय क्र.१), मानोरा

**प्रमाणपत्र**

मी हमी देते की, सदरच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | कु. आर. के. चव्हाण (श्रेणी–३) |
| न्यायालय | (श्री. ज. तु. कोरेगांवकर)<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मानोरा. |
| न्यायनिर्णय घोषीत दिनांक | २९.०७.२०२६ |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | २९.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेले दिनांक | २९.०७.२०२६ |